# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांकः10.09.2026** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

1. 20 हजार 800 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीच्या आठ रेल्वे प्रकल्पांना केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी.
2. आंतरराष्ट्रीय व्यापारात महिला उद्योजकांना संधी देण्यासाठी एकत्र काम करण्याचं वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांचं ब्रिक्स देशांना आवाहन.
3. भारताकडून नेपाळच्या मदतकार्यात वाढ, 130 टनांहून अधिक मदत साहित्य रवाना.
4. आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेत भारत आणि बांग्लादेश यांच्यात आज पहिला उपांत्य सामना.

**रेल्वे प्रकल्प मंजुरी**

केंद्र सरकारनं 20 हजार 800 कोटी रुपयांहून अधिक गुंतवणुकीच्या आठ रेल्वे 'मल्टी-ट्रॅकिंग' प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. तसंच 11 हजार किलोमीटर लांबीच्या सात उच्च रहदारीच्या रेल्वेमार्गांचं चौपदरीकरण करण्याचाही निर्णय घेतला आहे. यात दिल्ली-हावडा, मुंबई-हावडा, दिल्ली-मुंबई, मुंबई-चेन्नई आदी मार्गांचा समावेश आहे, असं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांना सांगितलं.

या प्रकल्पांचा उद्देश रेल्वे मार्गांची क्षमता वाढवणं, कामकाजाची कार्यक्षमता सुधारणं आणि महत्त्वाच्या मार्गांवरील वाहतुकीची कोंडी कमी करणं हा आहे. यामुळं जवळपास 2,100 गावांना आणि 52 लाख लोकांना फायदा होईल, असंही वैष्णव यांनी सांगितलं.

आठ रेल्वे 'मल्टी-ट्रॅकिंग' प्रकल्पांपैकी 10 हजार 783 कोटी रुपयांहून अधिक खर्चाचे तीन प्रकल्प पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमधील 14 जिल्ह्यांमध्ये, तर 10 हजार 21 कोटी रुपये खर्चाचे इतर पाच प्रकल्प तामिळनाडू, आंध्र प्रदेश, कर्नाटक आणि तेलंगण या राज्यांमधील 17 जिल्ह्यांमध्ये राबवले जातील. हे प्रकल्प 2029-30 पर्यंत पूर्ण करण्याचं नियोजन आहे, असंही वैष्णव यांनी स्पष्ट केलं.

मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन सेवा पुढील वर्षी सुरू होईल, याचं काम वेगाने सुरू असून, सुरत ते वापी या सुरुवातीच्या 100 किलोमीटरच्या टप्प्याचे काम पूर्ण करून तो मार्ग खुला केला जाईल, असंही वैष्णव यांनी सांगितलं. मंत्रिमंडळाच्या या निर्णयामुळे प्रवासी वाहतूक जलद होईल, संपर्क व्यवस्था आणि मालवाहतुकीची क्षमता वाढेल, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.

**'सेवा संकल्प अभियान'**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय जीवनाला येत्या 7 ऑक्टोबर रोजी 25 वर्ष पूर्ण होत आहेत. यानिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीनं येत्या 17 तारखेपासून महिनाभर 'सेवा संकल्प अभियान' राबवण्यात येणार आहे, अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांनी काल नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत दिली. 'सेवा संकल्प अभियानाची सुरुवात रक्तदान शिबिरानं होईल. तसंच 7 ऑक्टोबर रोजी ग्रामीण आणि शहरी भागांना जोडणारी 'सेवा ज्योती कलश यात्रा' काढली जाईल, असंही नवीन यांनी सांगितलं.

**ब्रिक्स-गोयल**

आंतरराष्ट्रीय व्यापारात महिला उद्योजक आणि महिला-नेतृत्वाखालील उद्योगांसाठी संधी वाढवण्यासाठी ब्रिक्स देशांना एकत्र काम करण्याचं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी केलं आहे. ते काल नवी दिल्ली इथं ब्रिक्स डब्ल्यूबीए महिला-नेतृत्व विकास परिषदेत बोलत होते. महिलांच्या मालकीच्या उद्योगांना आंतरराष्ट्रीय प्रदर्शने, परिषदा, चर्चासत्रे, व्यावसायिक मंचांवर अधिक सक्रियपणे सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देण्याची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यासाठी कर्जपुरवठा, बाजारपेठांमध्ये सहज प्रवेश तसंच निश्चित व्यावसायिक नियमांची गरज असल्याचंही गोयल यांनी सांगितलं.

**कृषी बैठक**

कृषी आणि वनीकरण क्षेत्रातली नववी आसियान-भारत मंत्रीस्तरीय बैठक काल नवी दिल्लीत पार पडली. या बैठकीत केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान आणि फिलिपिन्सचे कृषी सचिव फ्रान्सिस्को पी. टियू लॉरेल सहभागी झाले होते. यावेळी हवामान-अनुकूल शेती, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित शेती, मृदा आरोग्य, जल उत्पादकता, अन्न सुरक्षा, कृषी-वनीकरण आदी क्षेत्रांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यावर दोन्ही मंत्र्यांनी सहमती दर्शवली.

**नेपाळ पूर-मदत**

नेपाळमधील भीषण पुराच्या पार्श्वभूमीवर भारतानं नेपाळच्या मदतकार्यात वाढ केली असून, 130 टनांहून अधिक मदत साहित्य पोहोचवलं आहे. तसंच शोध, बचाव आणि न्यायवैद्यक कामात मदतीसाठी 54 तज्ज्ञ कर्मचारी तैनात केले आहेत. भारतीय हवाई दलाचे 35 टन मदत आणि बचाव साहित्य घेऊन जाणारं आठवं विमान काल काठमांडूमध्ये उतरलं आहे, असं नेपाळमधील भारतीय दूतावासानं काल सांगितलं. दरम्यान, भारताच्या विशेष बोगदा बचाव पथकानं नेपाळी लष्करासोबत चिलिमे आणि लांगटांग या जोखमीच्या भागात संयुक्त शोधमोहीम सुरू केली आहे.

**आत्महत्या प्रतिबंध दिन**

आज जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिन आहे. आत्महत्या प्रतिबंध आणि मानसिक आरोग्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिवस जगभरात साजरा केला जातो. आत्महत्या प्रतिबंधाबाबत जनजागृतीसाठी आज देशभरात आज अनेक उपक्रम राबवले जाणार आहेत.

**इराण-अमेरिका**

इराणची कच्च्या तेलाची पाच जहाजं अमेरिकेनं नष्ट केल्यानंतर इराणशी समन्वय न साधता नवीन प्रतिबंधित समुद्री क्षेत्रासह होर्मूझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करणाऱ्या जहाजांवर निर्बंध लादण्याचा इशारा इराणनं दिला आहे.

**इराण युरेनियम**

दरम्यान, घोषित न केलेल्या ठिकाणांवर आढळलेल्या युरेनियमबाबतच्या चौकशीतल्या इराणच्या असहकारामुळं, आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा संस्था आय.ए.ई.ए. नं गेल्या 20 वर्षांत पहिल्यांदाच हे प्रकरण संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेकडं सोपवलं आहे.

**FATF**

आर्थिक गुन्ह्यांसाठी डिजीटल गेमिंग आणि जुगाराच्या प्लॅटफॉर्मसचा गैरवापर होत असल्याचं आर्थिक कारवाई कृती दल, FATF ने म्हटलं आहे. याबाबत त्यांनी विविध देशांतील सरकारे, नियामक संस्था आणि व्यावसायिकांना जागतिक पातळीवर सतर्क राहण्याचा इशारा दिला आहे.

**राजनाथ सिंह**

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल कोलंबो इथं श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा कुमारा दिसानायके आणि पंतप्रधान डॉ. हरिणी अमरासुरिया यांची भेट घेतली. विकासाच्या क्षेत्रातील सहकार्याबाबत दोन्ही पक्षांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली. या भेटी

दरम्यान, श्रीलंकेच्या हवाई दलासाठी L-70 तोफांचं आधुनिकीकरण आणि दोन्ही देशांच्या राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय संरक्षण महाविद्यालयांमधल्या सहकार्याबाबत सामंजस्य करार करण्यात आले

**ग्रामीण विकास**

ग्रामीण विकास मंत्रालयांतर्गत असलेला 'भू-संसाधन विभाग' आज तिसऱ्या 'डिजिटल इंडिया लँड रेकॉर्ड्स मॉडर्नायझेशन प्रोग्राम' साठीची मार्गदर्शक तत्त्वे जारी करणार आहे. या योजनेसाठी 565 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये पाच वर्षांचा कृती आराखडा सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये अंमलात आणला जाईल. या योजनेअंतर्गत नकाशे, जमिनीच्या मालकीचे तपशील, मालमत्ता नोंदणी आणि न्यायालयीन प्रकरणे परस्पर-सुसंगत पद्धतीनं एकत्र केलं जाणार आहे.

**आगाखान-भारत भेट**

इस्माईली मुस्लिम समुदायाचे 50 वे वंशपरंपरागत इमाम आणि 'आगा खान डेव्हलपमेंट नेटवर्क'चे अध्यक्ष, पाचवे प्रिन्स रहीम आगा खान पहिल्या भारत भेटीसाठी नवी दिल्लीत दाखल झाले आहेत. प्रिन्स रहीम आगा खान राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्री आणि परराष्ट्र मंत्र्यांची भेट घेणार आहेत.

**गोवा-गडकरी**

केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल गोव्यातील सहा-पदरी 'पोरवोरीम एलिव्हेटेड कॉरिडॉर'चं उद्घाटन केलं. सुमारे 641 कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या 5 किलोमीटरपेक्षा जास्त लांबीच्या या मार्गावरून दररोज 75,000 ते 80,000 वाहनांची ये-जा होण्याची अपेक्षा आहे. यामुळं सध्याच्या रस्त्यावरील वाहतुकीचा ताण 60 टक्क्यांनी कमी होईल, असं गडकरी यांनी यावेळी सांगितलं. सुधारित पायाभूत सुविधा आणि संपर्क व्यवस्थेमुळं गुंतवणूक आकर्षित होईल, रोजगार निर्माण होतील आणि आर्थिक विकासाला चालना मिळेल, असंही त्यांनी नमूद केलं.

**टेनिस**

अमेरिकन ओपन टेनिस स्पर्धत अमेरिकेचे बेन शेल्टन आणि 11 वा मानांकित फ्रान्सिस टियाफो यांच्यात पुरुष एकेरीची उपांत्य फेरी आज होईल. उद्या होणाऱ्या महिला एकेरीच्या उपांत्य फेरीत, गतविजेती आर्यना सबालेंका हिचासामना तिसऱ्या मानांकित असलेल्या जेसिका पेगुलाशी होईल, तर चौथं मानांकन असलेली कोको गॉफ ही कझाकस्तानच्या एलेना रायबाकिनासोबत सामना खेळेल.

**पॅरा-तिरंदाजी**

जागतिक तिरंदाजी पॅरामालिकेच्या तिसऱ्या टप्प्याचा समारोप काल अहमदाबाद इथं झाला. काल शेवटच्या दिवशी, पॅरालिम्पिक चॅम्पियन हरविंदर सिंग आणि जागतिक क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असलेल्या शीतल देवी यांच्या नेतृत्वाखाली भारतानं दोन सुवर्ण आणि चार कांस्य पदकं जिंकली. या स्पर्धेत चार सुवर्ण, तीन रौप्य आणि आठ कांस्य पदकांसह भारतानं 15 पदकं मिळवली आहेत.

**क्रिकेट**

दुबई इथं सुरु असलेल्या 20 षटकांच्या आशिया चषक महिला क्रिकेट स्पर्धेत आज उपांत्य फेरीतील पहिला सामना भारत आणि बांग्लादेश यांच्यात होणार आहे. साखळी फेरीतील सर्व सामने जिंकून भारतानं गटात अव्वल स्थान पटकावलं आहे. भारतीय प्रमाणवेळेनूसार रात्री 8 वाजता सामना सुरु होईल.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं,

# नमस्कार.